# लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शनिवार - २६ ऑगस्ट २०२३

वर्ष - ३७ वे

अंक - १४६

पाने - ४

E-Mail : dailybhukamp@gmail.com


RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये





लातूर - तिरुपती

श्री. बालाजी दर्शनासहित

A/C SLEEPER | AIR SUSPENSION

ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक

ऑगस्ट महिन्याच्या तारखा

◂ दर मंगळवारी ▸

1 8 22 29

दुपारी २.०० वा.

अधिक माहितीसाठी संपर्क

88888 50441

88888 45404

विश्व ट्रॅव्हल्स लातूर.








# प्रत्येक विद्यार्थ्यास तीन गणवेश

# शाळा, व्यापाऱ्याकडून होतोय धंदा

**लातूर : गरिब, मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या लातूर सारख्या शहरात मोठ्या प्रमाणात आहे. पण, अशा शाळांनी ड्रेस (कपडे) दुकानदाराशी अर्थ पूर्ण व्यवहार करून एका विद्यार्थ्यास तीन-तीन गणवेश सक्तीचे केले आहेत. शाळा व ड्रेसेस व्यापारी मिळून पालकांची लूट करित आहेत.**

लातूर शहराचा पूर्व भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात काही शाळा आहेत. या शाळेत बुधवार, शनिवारसाठी वेगवेगळे आणि ईतर वारी एक असे तीन गणवेश सक्तीचे आहे. एक गणवेश साधारणपणे १५००/- चा आहे. ४५००/- रूपये केवळ गणवेशाला खर्च करावे लागतात. या भागात मोलमजुरी करणारे, गरीब, मध्यमवर्गीय मोठ्या संख्येने आहेत. त्यांना एक गणवेश परवडत नाही. तिथे तीन स्वतंत्र गणवेश कसे परवडतील अशी तक्रार पालक करित आहेत. वेगवेगळे असे तीन गणवेश परिधान केले नाही तर विद्यार्थ्यांना शाळेत बसू दिले जात नाही. बरे त्या-त्या शाळेचा असा विशिष्ट गणवेश कपडा घेऊन शिवून घ्यावा तर तो कपडा सर्वत्र उपलब्ध नसतो, तशा डिझाईनचा कपडा कोण शिऊन देत नाही. संबंधीत शाळा आणि ठराविक कपडा व्यापारी शाळेशी संपर्क ठेऊन, अर्थपूर्ण व्यवहार करून विशिष्ट ड्रेस आपल्या दुकानी ठेवतात, पालकांना देखील त्याच दुकानातून, दुकानदार सांगेल त्या भावात गणवेश घ्यावा लागतो. एक शाळा एक गणवेश याची पूर्तता केली जाऊ शकते. तीन-तीन गणवेशामुळे, शाळा-व्यापाऱ्यांचा स्वार्थ साधला जातोय. पालकांना भुर्दंड पडतोय, जि. प. प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष द्यावे. गणवेशाचा धंदा बंद करावा अशी मागणी होत आहे.



## पार्किंग नकाशावर, वाहने रस्त्यावर

लातूर महापालिकेच्या पुर्वेस पूर्वीच्या राठी पेट्रोल पंपाच्या जागेवर भव्य ईमारत आहे. बांधकाम परवान्यात 'नकाशावर' पार्किंग जागाही दाखविण्यात आली आहे. पार्किंग जागा दिसत नाही. पण इथे येणारी शेकडो वाहने रस्त्यावर 'पार्क' केली जातात. महापालिकेने ओडियाराज चौकात पार्किंगच्या जागेवर दुकान काढले म्हणून सील केले होते. इथे रहदारीच्या रस्त्यावर बेधडक वाहने पार्क केली जात आहेत.

# स्वस्तात वाहन देतो म्हणून फसवणूक पैसे मागताच अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

लातूर : लातूर येथील एका व्यक्तीस पुण्याच्या तिघा जणांनी आम्ही फायनान्स कंपनीचे एजंट आहोत तुम्हाला स्वस्तात वाहने देतो म्हणून ८ लाख ३५ हजार रूपये घेतले. ते परत मागण्यासाठी पुणे येथे गेले असता त्यांच्यावरच अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून मारहाण केली, फसवणूक केली. या प्रकरणी पुण्याच्या तिघा जणांविरूद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रफुल्ल अबाळे व इतर दोघेजन सर्व रा. हडपसर पुणे यांनी लातूर येथील गणेश भीमाशंकर माने रा. संत ज्ञानेश्वर नगर लातूर यांना आम्ही श्रीराम फायनान्स कंपनीचे एजंट आहोत. तुम्हाला नामांकीत कंपन्यांच्या मोटारसायकल, कार कमी किंमतीत देतो म्हणून आरटीजीएस, फोन पे व अन्य मार्गाने ८ लाख ३५ हजार रूपये घेतले. त्या तिघा जणांनी माने यांना ३ लाख रूपयांची म्हणून एक कार दिली. मात्र, बरेच दिवस होऊनही त्या गाडीचे कागदपत्रं दिले नाहीत. त्यानंतर माने हे हडपसर येथे जाऊन गाडीची कागदपत्रं व उर्वरीत ५ लाख ३५ हजार रूपयांची मागणी केली तेंव्हा प्रफुल्ल अबाळे व इतर दोघांनी माने यांना मारहाण केली. पैसे मागण्यास पुन्हा आलास तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. उलट माने यांच्या विरोधात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आदी तक्रारीनंतर विवेकानंद चौक पोलिसांत वरील तिघा जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ट्रेनच्या खासगी डब्याला आग, १० जणांचा मृत्यू

मदुराई : लखनऊवरून रामेश्वरला जाणाऱ्या एक्सप्रेसला आग लागल्याची भीषण घटना घडली आहे. तमिळनाडूतील मदुराई रेल्वेवर घडलेल्या या घटनेत १० लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या ट्रेनमधून गॅस सिलिंडरची तस्करी करण्यात येत होती आणि ज्यामुळे ही आगीची घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे आग लागली त्यावेळी या डब्यामध्ये ६५ प्रवासी होते. आज शनिवारी सकाळी ५ वाजून १५ मिनिटाला ही घटना घडली. ज्यानंतर प्रवाशांची एकच धांदल उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, तमिळनाडूमधील मदुराई रेल्वे स्थानकावर शनिवारी पहाटे उभ्या असलेल्या लखनऊ-रामेश्र्वर या ट्रेनच्या डब्यात आग लागून १० प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. डब्यात् बेकायदेशीरपणे 'गॅस सिलेंडर' नेण्यात येत होते, ज्यामुळे हा अपघात झाल्याचे दक्षिण रेल्वेकडून सांगण्यात आले आहे. ज्या डब्यात आग लागली तो 'खाजगी पार्टी कोच' होता (संपूर्ण कोच एका व्यक्तीने बुक केला होता) आणि त्यातील ६५ प्रवासी उत्तर प्रदेशातील लखनौहून मदुराईला पोहोचले होते. रेल्वे प्रशासनाने सांगितल्याप्रमाणे आग विझवण्याच्या प्रयत्नात गुंतलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त पोलीस, अग्निशमन दल आणि बचाव दलाच्या जवानांनी डब्यातून मृतदेह बाहेर काढले.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, हा एक खाजगी पक्षाचा डबा होता, जो काल (२५ ऑगस्ट) नागरकोइल जंक्शन येथे ट्रेन क्रमांक १६७३० (पुनालुर-मदुराई एक्स्प्रेस) शी जोडला गेला होता. डबा वेगळा करून मदुराई रेल्वे स्थानकावर उभा करण्यात आला. या डब्यात प्रवाशांनी बेकायदेशीरपणे गॅस सिलिंडर आणले होते आणि त्यामुळेच आग लागली.

समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी या घटनेसाठी रेल्वेला जबाबदार धरले आहे. त्यांच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. तर त्यांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी करत मृतांच्या कुटुंबीयांना १-१ कोटींची भरपाई देण्याचे सांगितले आहे. अखिलेश यादव यांनी या घटनेबाबतचे ट्वीट करत म्हटले आहे की, रेल्वेच्या निष्काळजीपणामुळे मदुराई येथे झालेल्या रेल्वे अपघातात उत्तर प्रदेशातील १० जणांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. श्रद्धांजली! या निष्काळजीपणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. आणि मृतांच्या कुटुंबीयांना शिक्षा झाली पाहिजे. १-१ कोटी नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावे.

## माजी नगरसेवक नेताजी देशमुख यांचे निधन



लातूर : लातूर नगर परिषदेचे माजी नगरसेवक नेताजी रघुनाथ देशमुख (६१) यांचे निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर शनिवार दि. २६ ऑगस्ट २०२३ रोजी दु. ४ वाजता कन्हेरी गाव शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. एक धडाडीचा लोकप्रतिनिधी अशी नेताजी देशमुख यांची ख्याती होती. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, चार भाऊ असा परिवार आहे.

## उलट्या कोयत्याचा धाक ७ हजार रूपये काढून घेतले

लातूर : येथील खाडगाव रोड स्मशानभूमीसमोर तिघा जणांनी उलट्या कोयत्याचा धाक दाखवून अंगा-खांद्यावर मारहाण करून खिशातील ७ हजार ४०० रूपये काढून घेतल्या प्रकरणी शिवाजी नगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल सुभाष उरगुंडे रा. रायवाडी, ता. लातूर हे व त्यांचे भाऊ खाडगाव स्मशानभूमीसमोरील एका गॅरेजवर मोटारसायकल दुरूस्तीसाठी थांबले असता अक्षय जाधव (कोद्रे) व सोबत दोघेजन तिथे आले. त्यांनी उरगुंडे यांना उलट्या कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करून खिशातील ७ हजार ४०० रूपये काढून घेतले.

## त्यांच्या मते....

▣ **आपल्याला पुन्हा एकदा राजकारणाची व्याख्या निश्चित करावी लागेल.**

-नितीन गडकरी

- - - - - - - - - - -

☛ राजकारणाची नव्हे तर व्यवहार (आचाराची) व्याख्या निश्चित करावी लागेल.

▣ **खासदार नवनीत राणा यांनी भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवावी अन्यथा आम्ही वेगळा विचार करू**

- चंद्रशेखर बावनकुळे

- - - - - - - - - - -

☛ कमळाशिवाय आता राणा दांपत्याला पर्याय दिसत नाही.

▣ **शरद पवार कोल्हापुरात येताच मुश्रीफांच्या डोळ्यात पाणी, पवार साहेबांसोबत नाही याचं दुःख होत आहे.**

- हसन मुश्रीफ

- - - - - - - - - - -

☛ ईडीने बिघाडी केली

▣ **भाजप सरकारसाठी २०२४ ची लोकसभा निवडणूक शेवटची.**

- विजय वडेट्टीवार

- - - - - - - - - - -

☛ वाटेल ते वडेट्टीवार

# अहमदपूर विधानसभा मतदारसंघासाठी १५ कोटी

अहमदपूर : अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघासाठी आमदार बाबासाहेब पाटील यांच्या प्रयत्नातून १५ कोटी रुपयांचा विकासनिधी मंजूर झाला आहे .

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत ५ कोटी रुपये, वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अहमदपूर नगर परिषदेकरिता ५ कोटी रुपये तसेच चाकूर नगरपंचायत करिता ५ कोटी रुपये अशा एकूण १५ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांना राज्य शासनाने मंजुरी दिली आहे.

मंजूर निधीतून सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक, सभागृह बांधकाम व सुशोभीकरण असे विविध विकास कामे होणार आहेत. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना व वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांना मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाचे आभार आमदार बाबासाहेब पाटील यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

मतदारसंघातील विकासाला आज निधी उपलब्ध होत माझ्या विनंतीवरून १५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजूर प्राप्त झाली आहे. मंजूर निधीतून सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक, सभागृह बांधकाम, सुशोभीकरण यांसारखे अनेक विकास कामे हाती घेण्यात येणार आहेत.

## जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवास शहरवासियांचा प्रतिसाद

लातूर : कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषि विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रानभाज्या महोत्सवास शहरवासियांचा उत्तम प्रतिसाद लाभला. लातूर शहरातील अंबेजोगाई रोड येथील मुक्ताई मंगल कार्यालयात झालेल्या रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी सुनील यादव यांच्या हस्ते झाले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, कृषि विकास अधिकारी सुभाष चोले, वैद्यकीय शासकीय महाविद्यालय येथील आहार तज्ज्ञ प्रियंका शेंडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, कृषि उपसंचालक महेश क्षीरसागर, मांजरा कृषि विज्ञान केंद्राच्या आहार तज्ज्ञ अंजली गुंजाळ, स्मार्टचे नोडल अधिकारी मोहन गोजमगुंडे, माविमचे जिल्हा व्यवस्थापक मन्सूर पटेल, आत्माच्या प्रकल्प उपसंचालक मनिषा बांगर, प्रशासन अधिकारी अशोक गिरवले उपस्थित होते.

रानभाज्या महोत्सवांमध्ये लातूर जिल्ह्यातील ५८ स्टॉल धारकांनी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या रानभाज्या यामध्ये तोंडली, तांदूळजा, अंबाडी, करटूले, घोळ, टाळका, शेवगा, तांदूळ कुंद्रा, तरवटा, उंबर, काठेमात सेंद्रिय गुळ, सेंद्रिय तेल यासारख्या विविध प्रकारच्या रानभाज्या या महोत्सवामध्ये होत्या.

'ओळख रानभाज्यांची' या पुस्तकाचे यावेळी प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन कृषि पर्यवेक्षक सूर्यकांत लोखंडे यांनी केले, कृषि उपसंचालक महेश क्षीरसागर यांनी आभार मानले.

# गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकांना नोटीसा द्या-मागणी

रेणापूर : सरकारी गायरान जमिनीवर शेतीकरिता आणि निवासा करिता अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीसा द्या.सरकारी जमिनीवर पेरणी केलेल्या पिकांचा पंचनामा करुन पिक पेऱ्यांची नोंद करण्याची मागणी शुक्रवारी तालुक्यातील शेकडो अतिक्रमीत गायरान धारकांनी वंचीत हक्क अंदोलन महाराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून रेणापूर तहसीलदार, गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन देवुन केली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील सरकारी गायरान जमिनीवर शेतीकरिता आणि निवासा करिता केलेल्या आतिक्रमणाची दखल घेवुन अतिक्रमणा बाबत सरकारला महसुल संहिता ५० प्रमाणे नोटीसा बजावण्याचे आदेश दिले होते त्याप्रमाणे सरकारच्या वतीने महसुल विभागाने जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत बहुतांश जिल्ह्यातील अतिक्रमण धारकांना नोटीसा बजावल्या आहेत परंतु लातूर जिल्हाधिकारी यांनी केवळ ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण जमिनीवरील निवासा करिता घरे बांधणाऱ्यांना काही ठिकाणी नोटीसा बजावल्या आहेत परंतु सरकारी गायरान वनजमिनीवर शेतीकरिता अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या नाहीत.महसुल संहिता ५० प्रमाणे नोटीसा दिल्या असत्या तर त्या नोटिसांना महसुल संहिता ५१ प्रमाणे रितसर पुराव्यानिशी उत्तर देता आले असते परंतु नोटीसा न दिल्याने रेणापुर तालुक्यातील मौजे पानगांव, गरसुळी, तत्तापुर, डिगोळ, पोहरेगांव, मोटेगांव, बावची, आरजखेडा आदी गावातील मागासवर्गीय भूमिहीन अतिक्रमण धारकांचे मोठे नुकसान झाले आहे.

सन १९८० पासुन सरकारी गायरान जमिनीवर (वनजमिन) अतिक्रमण करून त्या जमिनी लागवडी खाली आनुन त्या जमिनीत उपजिवीके करिता लागणारे ज्वारी,तुर,मुग, उडीद,तीळ,कारळ,अदि पिकांची लागन करून आपल्या कुंटूबांचा चारीतीर्थ चालविला आहे.त्यावरच त्यांची उपजिवीका भागवित आहेत. दरवर्षा प्रमाणे यावर्षीही त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या सरकारी गायरान जमिनीत,वन जमिनीवर दरवर्षा प्रमाणे आजही पिकांची लागन केली आहे.तहसीलदार रेणापुर यांनी सरकारी गायरान जमिनीवर शेतीकरिता आणि निवासा करिता अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीसा द्याव्यात. जमिनीवर पेरणी केलेल्या पिकांचा त्वरीत पंचनामा करुन पिक पेऱ्यांची नोंद करावी यामागणी करिता तालुक्यातील शेकडो अतिक्रमीत गायरान धारकांनी वंचीत हक्क अंदोलन महाराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून रेणापूर तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनावर नागनाथ चव्हाण, बालाजी शिंदे, विष्णु आचार्य, राहूल गंडले, अविनाश शिंदे, अंकूश चिकटे, दिगांबर चव्हाण, मधुकर शाहीर, किशोर कसबे, बालीका चिकटे, रमेश घोडके, रमेश तिगोटे, मोहन वायदंडे, रतनमामा गायकवाड, संजय जोगदंड, प्रणिता आचार्य, वाल्मीक घोडके, गौतम आचार्य यांच्यासह तालुक्यातील शेकडो अतिक्रमीत महिला पुरुष गायरान धारकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




## जेट्रोफाची (मोगली एरंड), शेती बनवेल मालामाल



शेतकरी मित्रांनो जर तुम्हीही जेट्रोफाची लागवड करत असाल किंवा करण्याच्या तयारीत असाल तर ही माहिती तुमच्यासाठी. साध्या स्पेलरद्वारे जट्रोफाच्या बियांमधून तेल काढले जाते. तेल फिल्टर केल्यानंतर बायोडिझेल तयार केले जाते, ते ट्रॅक्टर, जनरेटर,रेल आणि इतर सर्व प्रकारच्या जड डिझेल वाहनामध्ये याचा वापर केला जातो. त्यामुळे त्याची लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते.

जट्रोफा ज्याला आपण मोगली एरंड असं सुद्धा म्हणतो असं सांगितलं जात की मुगल काळात मुगल ह्याचा वापर मशाल पेटवण्यासाठी करत म्हणुन ह्याला मोगली एरंड असं संबोधलं जात. जेट्रोफा एक झुडुपी वनस्पती आहे. ह्याचे झाड फार लवकर परिपक्व होते. देशातील अनेक राज्यांमध्ये याची लागवड केली जाते, कारण याची शेती फायद्याचा सौदा ठरत आहे. हळूहळू त्याची मागणी देखील वाढत आहे.

ह्याच्या बियांमधून बरेच तेल बाहेर येते जे जड वाहणांचे इंजिन चालवण्यासाठी वापरले जाते. अशा परिस्थितीत, जेव्हा डिझेलचे भाव गगनाला भिडत असतात, तेव्हा हे बायोडिझेल एक चांगला पर्याय असू शकतो. या व्यतिरिक्त, लोक त्यांच्या बागेत सजावटीसाठी देखील त्याची लागवड करतात. पडीक व नापीक टाकाऊ जमीन हिरवीगार करण्यासाठीही याची लागवड केली जाते.

**सरकारने घेतला मोठा निर्णय**

सरकारने डिझेलमध्ये मिसळत असलेल्या बायोडिझेलवरील जीएसटी दर १२ टक्क्यांवरून ५ टक्के केला आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की यामुळे बायोडिझेलची मागणी वाढेल. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

**जट्रोफाचे फायदे**

शेतकरी त्यांच्या शेताच्या आसपास जट्रोफाची रोपे लावतात, ज्यामुळे ती शेताभोंवती कुंपण करण्यासाठी पण होते आणि साहजिकच पिकांचे जनावरांपासून संरक्षण होते. याशिवाय जत्रोफाच्या बिया तेलासाठी वापरल्या जातात. साबण त्याच्या तेलापासून बनवले जाते. जट्रोफामध्ये औषधी गुणधर्म देखील आहेत. यामध्ये जॅट्रोफिन नावाचा घटक आढळतो. ज्यामध्ये कॅन्सरविरोधी घटक आहेत. त्याचे तेल कर्करोगाशी संबंधित औषधांमध्ये वापरले जाते. त्वचेच्या आजारांमध्ये (दाद, खरुज, खाज सुटणे, संधिवात, अर्धांगवायू) इत्यादींमध्येही याचा वापर केला जातो. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जट्रोफाच्या बियांमधून तेल सामान्य स्पेलरद्वारे काढले जाते. तेल फिल्टर केल्यानंतर, ते ट्रॅक्टर, जनरेटर, रेल आणि सर्व प्रकारच्या डिझेल वाहनेमध्ये वापरले जाते. त्यामुळे त्याची लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते.

**जेट्रोफासाठी जमीन आणि हवामान**

जट्रोफा लागवडीसाठी कोणत्याही प्रकारच्या जमिनीचा वापर केला जाऊ शकतो. हे सर्व प्रकारच्या जमिनीत पिकवले जाऊ शकते. परंतु हे लक्षात ठेवा की जिथे त्याची लागवड केली जात आहे, तिथे पाणी साचू नये. ह्या पिकासाठी जास्त पाणी लागत नाही.

**पूर्वमशागत व लागवड**

जट्रोफाच्या लागवडीपूर्वी शेत तयार करण्यासाठी तीन ते चार वेळा चांगली नागरणी करावी लागते. ह्या पिकाची लागवड पाऊस सुरू होण्यापूर्वी केली जाते. लागवडीसाठी वनस्पती ५ ु ४५ सें.मीचे खड्डे बनवा आणि प्रत्येक खड्ड्यात एक टोपली कंपोस्ट खत आणि २०० ग्रॅम निंबोळी पावडर मिसळून खड्डा भरला पाहिजे. रोपांच्या पुनर्लावणीच्या वेळी, प्रत्येक खड्ड्यात सुमारे २० ग्रॅम युरिया + १२० ग्रॅम सुपरफॉस्फेट + १५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश मिसळावे. जट्रोफा दुसऱ्या वर्षी सुमारे २५ ते ३० क्विंटल, तिसऱ्या वर्षी ४० ते ५० क्विंटल, चौथ्या वर्षी ६० ते ८० क्विंटल आणि पाचव्या वर्षी १०० ते १२० क्विंटल उत्पादन देऊ शकते.

## फायद्याची अंजीर शेती



भारत, अमेरिका आणि आफ्रिका समवेतच अनेक देशांमध्ये अंजीरांची लागवड केली जाते. त्याची फळे ताजी आणि सुकवून देखील वापरली जातात. तसेच, त्याचे पिकलेले फळ मुरंबा बनवण्यासाठी वापरता येते. साधारणपणे, अंजीर लागवड अशा ठिकाणी केली जाते, जिथे हवामान समशीतोष्ण आणि कोरडे असते. जर आपण भारताबद्दल बोललो तर त्याची लागवड तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या काही भागात केली जाते. अंजीरची झाडे सुमारे दोन वर्षांनी फळे देण्यास सुरवात करतात. चार ते पाच वर्षांच्या झाडापासून सुमारे १५ किलो फळे मिळतात. तज्ञांच्या मते, पूर्ण विकसित झालेल्या अंजीरच्या झाडातून एका वेळी १२००० रुपयांपर्यंत कमाई करता येते.

**अंजीर लागवड आणि महाराष्ट्र**

व्यापारी तत्वावर अंजीरची लागवड फक्त महाराष्ट्रात केली जाते. सध्या, महाराष्ट्रात एकूण ४१७ हेक्टर क्षेत्रामध्ये अंजिरची लागवड केली जाते, अंजीरची लागवड ही महाराष्ट्रात मुख्यता पश्र्चिम महाराष्ट्रात केली जाते, त्यापैकी ३१२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र एकट्या पुणे जिल्ह्यात आहे. सातारा आणि पुणे जिल्ह्यांच्या हद्दीतील निरा नदीच्या खोऱ्यात खेड-शिवरा ते जेजुरी (पुरंदर-सासवड तालुका) पर्यंत १०-१२ गावांचा परिसर महाराष्ट्रातील अंजीर उत्पादनाचा प्रमुख भाग आहे.

आता, पश्र्चिम महाराष्ट्रातील अजून एका जिल्ह्यात म्हणजे सोलापूरमध्ये अंजीरची लागवड केली जात आहे तसेच विदर्भात पण अंजीरची लागवड होताना दिसत आहे विदर्भातील उस्मानाबादमधील शेतकऱ्यांनी अंजीराची लागवड सुरू केली आहे. यावरून असे म्हणता येईल की दुष्काळग्रस्त भागात अंजीरची वाढ चांगली होते.

**केव्हा लावायचा अंजीर?**

अंजीर उष्ण आणि कोरडे हवामानात वाढणारे पिक आहे. यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अंजीर लागवड करण्यास वाव आहे. अनेक शेतकरी सांगतात की, कमी तापमान या पिकासाठी हानिकारक नाही आहे पण दमट हवामान नक्कीच धोकादायक ठरते. अंजीर विशेषतः कमी पर्जन्य असलेल्या भागात घेतले जाऊ शकते, जेथे ऑक्टोबर ते मार्च पर्यंत पाण्याची कमतरता असते तिथे अंजीर लागवड केली जाऊ शकते.

**जमीन कशी बरं असावी?**

अंजीरची लागवड मध्यम काळया आणि लाल माती असलेल्या जमिनीत करता येते. मोठ्या प्रमाणात चुनखडी असलेल्या खारट काळया जमिनीत अंजीर खूपच चांगले वाढते असे विशेषज्ञ म्हणतात. चांगली निचरा होणारी आणि कमीत कमी जमिनीत एक मीटर खोलपर्यंत माती अंजिरच्या वाढीसाठी चांगली असते, मात्र या जमिनीत चुनाचे प्रमाण असावे.

या फळाच्या झाडासाठी दांदगी काळी जमीन चांगली नसते, अंजीरला डाळिंबसारखीच हलकी जमीन चांगली असल्याचे मानले जाते. झाड उथळ आणि चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत पाहिजे तसे वाढत नाही.

## अनेक मजली पीक पद्धत आहे फायद्याची, नेमके काय आहेत फायदे या पीकपद्धतीचे

कृषी क्षेत्रामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे व त्याद्वारे शेतीचे उत्पादन व पर्यायाने हातात येणारे उत्पन्न यात



वाढ होईल असा प्रयत्न शेतकरी बंधू सातत्याने करताना दिसतात. तसेच वेगवेगळ्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती करण्याच्या पद्धतीतही दिवसेंदिवस बदल होत आहे.

आपल्याला माहिती आहे की हायड्रोपोनिक्स,ऐरोपोनिक्सअशा पद्धतीने शेतीचे विविध प्रकार अवलंबिले जात आहेत. जाता जाता एक नवीन प्रकार म्हणजे अनेक मजली शेती किंवा बहुमजली शेती करण्याकडे देखील शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. या लेखात आपण याबद्दल माहिती घेऊ.

**नेमकी काय आहे ही अनेक मजली शेती पद्धती?**

अनेक मजली पीक पद्धत किंवा बहुमजली पीक पद्धत एक पीक घेण्याची पद्धत आहे. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे तंत्र म्हणजे जमिनीत पिकाची लागवड ही उंचीनुसार केली जाते. म्हणजे सर्वात जास्त उंची, नंतर मध्यम उंचीची व त्याखालोखाल कमी उंचीची अशी पिकांची वर्गवारी करून पिकांची लागवड केली जाते.

विशेष म्हणजे हे सगळे प्रकारचे पिके एकाच जमिनीवर घेतले जातात. या पीक पद्धतीमध्ये एकाच वेळी तीन ते चार किंवा पाच प्रकारचे विविध प्रकारचे पिके घेतली जाऊ शकतात. उदाहरणार्थ पाच मजली शेती असेल तर जमिनीच्या खाली आले किंवा हळद असे कंदवर्गीय पिके नंतर त्यावर सहा फुटाचा मंडप उभारून त्यावर कारले यासारखी वेलवर्गीय पीक तसेच पालेभाज्या प्रकारांमध्ये पालक किंवा कोथिंबीर सारखे पीक घेता येते. अशा पिकांच्या लागवडीमुळे तनाना अटकाव होतो व बाष्पीभवन रोखता येते.

जर लागवडीसाठी मिरची किंवा टोमॅटो अशी पिके निवडली तर पाच मजली ऐवजी चार किंवा तीन मजली प्रकार निवडावा लागतो.शेताच्या मंडपासाठी बांबु किंवा लाकडाचा वापर केला जातो. या पीकपद्धतीचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या पिकांना जास्त उष्णता मानवत नाही अशा पिकांना या पिक पद्धतीचा फायदा होतो.

त्यामुळे पिकांची योग्य प्रकारे वाढ होऊन अधिक उत्पादन मिळू शकते. या पीक पद्धतीत एका पिकाद्वारे दुसरा पिकास फायदा होतो. एकाच जमिनीवर वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतल्यामुळे वर्षभर उत्पादन मिळत राहते व पीक मशागती वरील खर्च देखील कमी होतो.

**अनेक मजली पीक पद्धतीचे फायदे**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या पीक पद्धतीमध्ये कमीत कमी क्षेत्रावर चार ते पाच पीक एका हंगामात घेणे शक्य होते.

या शेती पद्धतीमध्ये जवळजवळ ९० टक्क्यांपर्यंत तणांचे नियंत्रण होते.


एकाच शेतजमिनीवर पाच प्रकारची पिके घेतल्याने पाण्याच्या वापरामध्ये ६० ते ७० टक्क्यांपर्यंत बचत शक्य होते. अवघ्या २० ते ३० टक्के पाण्यात एकाच वेळी पाच पिके घेणे शक्य होते.

या अनेक मजली पीक पद्धती मध्ये पाण्याचे बाष्पीभवन रोखता येते.

जलसंधारण आणि मृदा संधारण चांगल्या पद्धतीने करता येते.

पारंपारिक शेती पद्धतीच्या तुलनेने अनेक मजली पीकपद्धती या माध्यमातून दुप्पट उत्पन्न मिळू शकते.

## पिकांमध्ये दुय्यम अन्नद्रव्यांची कमतरता आणि त्यांचा अतिरेक ठरू शकतो पिकांसाठी धोकादायक



कालच्या लेखामध्ये आपण पिकांमधील मुख्य अन्नद्रव्यांची कमतरता व त्यांचा अतिरेक यामुळे होणारे परिणाम पाहिले. या लेखात आपण काही महत्त्वाचे दुय्यम अन्नद्रव्याची पिकांसाठी असलेली उपयुक्तता आणि त्यांचे कमतरतेची लक्षणे,तसेच या दुय्यम अन्नद्रव्यांचा अतिरेकी वापर त्यामुळे पिकांवर होणारा परिणाम याबद्दल जाणून घेणार आहोत.

दुय्यम अन्नद्रव्य

लोह - लोह हरितद्रव्य तयार होण्यासाठी फारच उपयुक्त आहे. लोहा मुळे झाडामध्ये विविध संप्रेरके तयार होतात.

पिकांमधील लोहाच्या कमतरतेची लक्षणे

पिकांमध्ये जर लोहाची कमतरता असेल तर सुरुवातीला कोवळी पाने शिरा वगळता पिवळी पडतात. लोहाची कमतरता जास्त असेल तर पूर्ण पान पांढरे पडते.

जास्त लोहाचा वापर केल्याची लक्षणे

पिकांच्या पानांवरती लहान स्वरूपातील तपकिरी ठिपके आढळतात.

मॅगेनीज- कार्य= बियाण्याची उगवण क्षमता वाढवण्यासाठी मॅगनीज उपयुक्त आहे. तसेच पिकांच्या पक्वतेची गती वाढवते. तसेच झाडांना नत्र उपलब्ध करून देण्यास सहाय्यभूत ठरते.

पिकांमधील मॅगनीज च्या कमतरतेची लक्षणे

ओट पिकाचा विचार केला तर यामध्ये पीक तपकिरी होते. रुंद पानांच्या पिकांमध्ये पिवळे पना आढळतो वाटाणा च्या शेंगांवर चिखल्यासारखे ठिपके आढळतात.गहू पिकामध्ये मूळकूज रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

मॅगनीजच्या अतिरेकी वापराचे लक्षणे

मॅगनीज चा जास्त वापर केला तर पीक तजेलदार वाटत नाही तसेच वाढदेखील थांबते.

३-झिंक- झिंक प्रथिने, संप्रेरके व त्याचबरोबर वाढीसाठी गरजेचे रसायने निर्माण करण्यास मदत करते.

झिंकच्या कमतरतेची लक्षणे

झिंक प्रामुख्याने मका, संत्री,भात,कांदा,सोयाबीन इत्यादी पिकांना फार गरजेचे असते. मका आणि ज्वारी पिकात फुलोरा पांढरा सापडणे, कापसामध्ये कमतरता राहिली तर कापसाच्या झाडाचे पान बारीक राहते.इत्यादी लक्षणे आढळतात.

झिंक च्या अतिरेकाचे लक्षणे

पिकांची मर होते. पिके पिवळी पडतात व लोह शोषण यात अडचणी येतात.

तांबे - तांबे हे पिकांमध्ये हरित द्रव्य निर्मितीमध्ये उपयुक्त आहे. पिकांमध्ये विविध संप्रेरकनात्यांचेकार्य करण्यात मदत करते.

पिकांमधील तांब्याच्या कमतरतेची लक्षणे

मका पिकामध्ये नवीन पाने पिवळी पडतात तसेच झाड बूटके राहते. तसेच पानाच्या कडा वाळतात.

तांब्याच्या अतिरेकी वापराचे लक्षणे

पिकांमध्ये जर जास्त तांब्याचा अतिरेक झाला तर जाड गर्द रंगाचे दिसते आणि मुळांची वाढ गरजेपेक्षा जास्त जाड होते.

बोरॉन- याच्या वापराने झाडाचे आरोग्य राखले जाते. कपाशी सारख्या पिकांमध्ये सगळयात महत्त्वाचे म्हणजे पातेगळ रोखण्यास मदत करते. तसेच जमिनीतील पाणी शोषण्याचा कामी झाडांची मुळाना मदत करते.

कमतरतेची लक्षणे

बोरॉनची कमतरता असेल तर पिकांची पाने जाड होतात. तसेच ते सुकतात व चूरडतात. तसेच पिकाच्या आणि फळांच्या देठाजवळ पाणीदार पट्टे आढळतात.

बोरॉनच्या अधिक वापराचे लक्षणे

बोररॉनच्याअधिक वापरा मुळे सुरुवातीला पानाचे टोक व नंतर पूर्ण पानच पिवळे पडते.

क्लोरीन - क्लोरीन पिकांना प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेत मदत करणे.

क्लोरीनचा कमतरतेची लक्षणे : झाड तात्पुरते वाळल्यासारखे वाटते. नवीन कोळी पाणी पिवळी पडतात अधिक प्रमाणात कमतरता असेल तर झाड पूर्णपणे वाळते.

क्लोरीनचा जास्त वापर केला तर दिसणारी लक्षणे

तंबाखू आणि बटाट्यासारखे पिकांमध्ये जर क्लोरीन च्या जास्त वापर केला तर या पिकांचे पानेजाड होतातव वळतात. त्याच बरोबर अधिक क्लोरीनचे वापरामुळे बटाट्याची साठवून जास्त कालावधीसाठी करता येत नाही.

## या तंत्रज्ञानाचा करा वापर आणि पिकवा बारमाही खरबूज

विविध पिकांची लागवड आणि लागवडीकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान यांची योग्य सांगड घातल्यामुळे एक उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते. यामध्ये संरक्षित शेतीचा विचार केला तर यामध्ये शेडनेट आणि पॉलिहाऊस तंत्रज्ञान खूप महत्त्वाचे आहे. जर आपण पॉलिहाऊस तंत्रज्ञान पाहिले तर यामध्ये नियंत्रित तापमानाचा वापर करून वर्षभर विविध पिकांची लागवड आपण करू शकतो व भरपूर उत्पादन मिळवू शकतो. तसेच कीड व रोग यापासून देखील प्रभावी संरक्षण आपल्याला करता येते.

या सगळ्या दृष्टिकोनातून पॉलिहाऊस तंत्रज्ञान हे पीक लागवडीसाठी खूप महत्त्वाचे आहे. याच पॉलिहाऊस तंत्रज्ञानाचा वापर करून महात्मा फुले कृषी विद्यापीठाने पुसासरबती, हरा मधु व दुर्गापुरा मधू या खरबूज पिकाच्या वानांची लागवड करण्याची शिफारस केली आहे. या माध्यमातून खरबूज पीक वर्षभर लावता येऊ शकते व उत्पादन मिळवता येऊ शकते.

**पॉलीहाऊस मधील लागवडीची पद्धत**

पॉलिहाऊस मध्ये जर खरबूज लागवड करायची असेल तर नोन यु कंपनीने माधुरी दोन आणि मधुमती यासारख्या वानांची शिफारस केली असून याकरिता पॉलिहाऊस मध्ये उंच गादीवाफे तयार करून खरबूज लागवड करणे गरजेचे आहे.



गादीवाफे तयार करताना त्यामध्ये चार फुटाचे आणि दोन रोपातील अंतर दीड फूट ठेवणे गरजेचे असून वाफ्याची उंची ही साधारणपणे दीड फूट व रुंदी दोन फूट असणे गरजेचे आहे. दहागुंठ्याचे पॉलिहाऊस असेल तर या क्षेत्रामध्ये साधारणपणे रोपांची संख्या २४०० पर्यंत असणे गरजेचे आहे.

**भरघोस उत्पादनासाठी या गोष्टींची घ्या काळजी**

खरबूज लागवड केल्यानंतर जेव्हा मुख्य वेल असते तिला आजूबाजूला येणाऱ्या फांद्या असतात ते वेळोवेळी काढणे गरजेचे आहे. वेलीला पहिले जे काही सात किंवा दहा पाने येतात त्यानंतर पहिल्या फळांची फळधारणा करून घ्यावी.परागीभवनाची योग्य वेळ सकाळी ९ ते ११ व सायंकाळी चार ते सहा या कालावधीत करावी.

वेलीवर एका वेळी शक्य असेल तर एकच फळ ठेवणे गरजेचे आहे. परागीभवन करत असताना आद्रता ८० टक्के असणे गरजेचे असून परागीभवन झाल्यानंतर ५० ते ५५ दिवसांमध्ये खरबूज काढणीस तयार होते. काढणी करण्यासाठी रिफ्रॅक्टमीटर च्या साह्याने फळातील साखरेचे प्रमाण तपासून घ्यावी व १४ ते १५ ब्रिक्स झाला तेव्हा त्याचे काढणी करावी. या पद्धतीने जर व्यवस्थापन कराल तर दीड ते दोन किलोपर्यंत फळाचे उत्पादन मिळू शकते.

**पॉलिहाऊस मधील खरबूज पिकासाठी पाणी व्यवस्थापनाची पद्धत**

या पिकाला पाण्याची व्यवस्थापन करताना खूप काळजी घ्यावी लागते. या पिकाला जास्त पाणी चालत नसल्यामुळे ठिबक सिंचन पद्धतीचा वापर हा महत्त्वाचा ठरतो. ठिबक संचाची निवड करताना चार लिटर प्रतितास क्षमता असणारी ड्रीप लाइन याकरिता निवडणे गरजेचे आहे. वातावरण तर ढगाळ असेल तर खूप कमी पाणी लागते. परंतु फळधारणा आणि फळ फुगवणीच्या वेळेमध्ये खूप पाण्याची आवश्यकता असते. साधारणपणे दोन ते तीन लिटर पाणी प्रती झाड प्रत्येक दिवशी असे नियोजन करणे गरजेचे आहे.

**अशाप्रकारे करा खत व्यवस्थापन**

खरबूज पिकाला खत व्यवस्थापन करताना नत्राची मात्रा लागवड करताना आणि आणि वाढीच्या अवस्थेमध्ये द्यावे. फॉस्फरसच्या पुरवठ्याकरिता सिंगल सुपर फॉस्फेट या खताचा वापर करावा तसेच पिकाच्या वाढीच्या सुरुवातीच्या कालावधीत पोटॅश हा घटक देखील महत्त्वाचा ठरतो. या पद्धतीने खतांचे नियोजन करावे. या मुख्य खतांसोबतच मायक्रो न्यूट्रिएंट आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये यांचा देखील संतुलित वापर करणे खूप गरजेचे आहे. बऱ्याचदा खरबूज फळाला छेद जातात. ही समस्या येऊ नये म्हणून अगदी सुरुवातीपासून कॅल्शियम व बोरॉन या अन्नद्रव्यांचा संतुलित वापर करावा.

**काढणी केल्यानंतर व्यवस्थापन**

खरबूज पिक काढणीस तयार होते तेव्हा काढणी झाल्यानंतर कोरोगेटेड बॉक्स मध्ये फोमनेटचा वापर करून फळे पॅकिंग करावीत व विक्रीसाठी पाठवावीत. प्रतिवेल दीड किलोपर्यंत फळे मिळतात.

**पॉलिहाऊस मधील खरबूज लागवडीचे प्रशिक्षण कुठे मिळेल?**

या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पॉलिहाऊस मधील खरबूज लागवड हे प्रामुख्याने कृषी विज्ञान केंद्र बारामती या ठिकाणी केली जाते. या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षणाची देखील सोय करण्यात आली आहे.

## शेतकऱ्याने करून दाखवलं! डाळिंबाच्या शेतीतून कमावले ८० लाख रुपये, जाणून घ्या कस लढवल डोकं..



पृथ्वीवर सोनं उगवते असं म्हणतात, पण सिंचन करण्यासाठी मेहनत आणि घामाचा उपाय हवा. सोने उधळणारी पृथ्वीची ओळख पाहायची असेल, तर बाडमेर सीमेवरील भीमडा गावात जेठाराम यांच्या शेतापेक्षा चांगले काहीही असू शकत नाही. जेठाराम यांनी २०१६ मध्ये त्यांच्या शेतात डाळिंबाची लागवड सुरू केली. आलम म्हणजे आता येथील डाळिंब कलकत्ता, महाराष्ट्र, बांगलादेश येथे निर्यात होत आहे.

राजस्थानमधील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचा कल डाळिंब लागवडीकडे वाढला आहे, त्यातील एक बारमेर जिल्हा आहे. जिथे शेतकरी डाळिंबाच्या लागवडीतून वर्षाला लाखोंची कमाई करत आहेत. एवढेच नाही तर थार शहरातील डाळिंब आता बांगलादेश, महाराष्ट्र, कलकत्ता येथे निर्यात होत आहे.

सीमावर्ती बाडमेर जिल्ह्यातील भीमडा गावातील रहिवासी जेठाराम यांनी २०१६ मध्ये त्यांच्या शेतात स्टार्टअप सुरू केले. १५ लाखांचे कर्ज घेऊन त्यांनी शेत तर तयार केलेच, पण महाराष्ट्रातील नाशिकमधून उत्तम दर्जाच्या डाळिंबाची चार हजार रोपे आणून त्यांच्या शेतात लावली.

२०१६ नंतर जेठाराम कोडेचा यांनी मागे वळून पाहिले नाही. आज त्यांच्या शेतीची उत्पादने केवळ बांगलादेश, अहमदाबाद, दिल्ली, कलकत्ता, मुंबई, बंगलोर येथेच जात नाहीत तर बांगलादेशातही जातात. ते दरवर्षी लाखोंचे पीक त्यांच्या शेतातून घेत आहेत. केवळ अंगठ्याचा ठसा, या शेतकऱ्याच्या शेतात केशर, सिंदूर अशा प्रगत जातीचे उत्पादन घेतले जात आहे.

बुडीवाडा, गुजरात आणि बारमेरमध्ये डाळिंबाची झाडे पाहून जेठारामने आपल्या शेतात लागवड करण्याचा विचार केला. तो सांगतो की आज तो ४५ बिघा जमिनीवर शेती करतो आणि त्याच्या एका डाळिंबाच्या झाडातून २५ किलो डाळिंब निघतात. भीमडा येथील रहिवासी जेठाराम सांगतात की, त्यांनी २०१६ मध्ये १५ लाखांचे कर्ज घेऊन डाळिंबाची लागवड सुरू केली. भगवा सिंदूरी जातीचे हे डाळिंब नाशिकहून आणले होते. त्यांच्या ४५ बिघा जमिनीवर ४ हजार रोपे लावली असून त्यातून त्यांना भरपूर नफा झाल्याचे ते सांगतात.

जेठाराम यांनी दिलेल्या माहितीनुसार, डाळिंब लागवडीतून दुसऱ्या वर्षी सुमारे ७ लाख, तिसऱ्या वर्षी १५ लाख, चौथ्या वर्षी २५ लाख, पाचव्या वर्षी ३५ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. ते म्हणतात की आजही शेतकरी जिरे, एरंड, इसबगोल यासारखी पिके घेत आहेत जी अत्यंत कमी नफा देणारी पिके आहेत. ५ वर्षात डाळिंबाच्या शेतीतून ८० लाखांहून अधिक उत्पन्न मिळाल्याचे ते सांगतात.

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शनिवार २६ ऑगस्ट २०२३


## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात लेफ्टनंट कर्नल वाय. बी. सिंग यांचा सत्कार

लातूर : श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे लेफ्टनंट कर्नल वाय. बी. सिंग यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बटालियनचे सुभेदार शेखर थोरात, बी. एच. एम. सुखविंदरपाल सिंग, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. डॉ. अभयकुमार धाराशिवे यांची उपस्थिती होती. लेफ्टनंट कर्नल वाय. बी. सिंग यांनी बटालियनस्तरावर पूर्व रिपब्लिक डे परेडसाठी महाविद्यालयातील पाच कॅडेट्सची निवड केली तसेच रिपब्लिक डे परेड संदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

## 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाद्वारे राज्य महिला आयोगाची लातूर येथे जनसुनावणी

लातूर : महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत सोमवार, २८ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथे नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या जनसुनावणीमध्ये महिलांना आपल्या तक्रारी स्थानिकस्तरावर थेट मांडता येईल. कोणतीही पूर्वसूचना न देता महिला आपल्या तक्रारी सुनावणीस उपस्थित राहून थेट लेखी स्वरुपात मांडू शकतील. जिल्हातील महिलांनी कोणत्याही शासकिय विभागाकडील अथवा कौटुंबिक हिंसांचार संबंधीच्या प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबत किंवा नवीन तक्रार लेखी नोंदविण्यासाठी जनसुनावणीला उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी देवदत्त गिरी यांनी केले आहे.

# दुष्काळी परिस्थितीबाबत तालुकानिहाय अहवाल त्वरीत सादर करा

## -कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश



औरंगाबाद : मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळ सदृश परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या पीक पाणी व पावसाच्या एकूण परिस्थितीचा आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी, पशुधन वाचविण्यासाठी चाऱ्याचे नियोजन करण्यासोबतच आठही जिल्हाधिकाऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीबाबत तालुकानिहाय आढावा घेत शासनास अहवाल सादर करावा. दुष्काळाची दाहकता लक्षात घेता आतापासून नियोजन महत्त्वाचे आहे. टंचाई स्थिती असली तरी काळजी करू नका, शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे, असा विश्र्वास कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिला. मराठवाड्यातील परिस्थितीबाबत सात दिवसाच्या आत महसूल, कृषी व विमा कंपन्यांचे प्रतिनिधी यांनी पंचनामे करावेत, असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज कृषीमंत्री श्री. मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी औरंगाबादचे पालकमंत्री संदीपान भुमरे, जालना व बीडचे पालकमंत्री अतुल सावे बैठकस्थळी तर व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, परभणीचे पालकमंत्री तानाजी सावंत, लातूरचे पालकमंत्री संजय बनसोडे व नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री संजय बनसोडे उपस्थित होते. कृषी आयुक्त सुनील चव्हाण, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, औरंगाबाद जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, जालना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ, परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीड जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे, लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे, नांदेड जिल्हाधिकारी अभिजित राऊत, उस्मानाबाद जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, हिंगोली जिल्हाधिकारी जितेंद पापळकर हे बैठकीत सहभागी झाले होते.

कृषीमंत्री श्री. मुंडे म्हणाले, मराठवाडयात दुष्काळ प्रवण भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व परिस्थिती नियोजनपुर्वक हाताळण्यासाठी आजची बैठक महत्त्वाची आहे. मराठवाडयातील बहुतांश मंडळात पावसाचा मोठा खंड आहे. पर्जन्यमापक यंत्र आहे त्याठिकाणी पाऊस झाला तर मंडळात पाऊस आहे, असे दिसत असले तरी परिस्थिती मात्र वेगळी आहे. त्यामुळे याबाबत गावशिवारातील परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल. केंद्रिय पातळीवरही याबाबत शासन पाठपुरावा करणार आहे. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

मराठवाडयातील पशूधनाचीही सर्वतोपरी काळजी घेण्यात येईल. पशुधनाला पुरेसा चारा उपलब्ध होण्यासाठी कृषी विभागाने चारा लागवडीचे नियोजन करावे. दुष्काळी परिस्थिती जरी वाढली तरी कोणत्याही परिस्थितीत चारा टंचाई निर्माण होणार नाही, ही बाब गांभीर्यपूर्वक विचारात घेत चारा लागवडीचे क्षेत्रनिहाय नियोजन करावे. सद्यस्थितीत काही भागात सक्तीने कर्जवसुली सुरू असून ही सक्तीची कर्जवसूली तातडीने थांबवा, खरिप कर्जाचे पुर्नगठन करण्याबाबत मंत्रीमंडळ बैठकीत प्रस्ताव मांडण्यात येईल, असेही श्री. मुंडे म्हणाले.

पिण्याच्या पाण्याबाबत मराठवाडयात टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेत टँकरबाबतची निविदा प्रक्रिया लवकरच पुर्ण करत गरज आहे त्या ठिकाणी टँकर देण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी यंत्रणेला दिल्या. दुष्काळी परिस्थितीत गाळमुक्त तलाव, गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. जिल्हा प्रशासनाने तलावातील गाळ काढून शेतकऱ्यांच्या शिवारात देण्याबाबत तातडीने कार्यवाही सुरू करावी. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेत आतापासून प्रत्येक पातळीवर नियोजन करून सर्व मिळून यातून मार्ग काढू. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्र्वास श्री. मुंडे यांनी दिला.

मराठवाडा मुक्ती संग्रामानिमित्त मंत्रीमंडळाची एक बैठक औरंगाबादेत होणार आहे. यामध्ये आपतकालीन, मध्य व दिर्घकालीन अशा उपायायोजना करून प्रश्र्न सोडविण्यासाठी ही बैठक महत्वाची ठरणार आहे. यासोबतच शेतकऱ्यांच्या विमा प्रश्र्नाबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. आठही जिल्ह्यातील पावसाचे प्रमाण, ओढ दिलेल्या क्षेत्रात पिकांची परिस्थिती तसेच शेतकऱ्यांना अंतरिम दिलासा देण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सह दहा वर्षातील सरासरी पर्जन्यमान, मंडळनिहाय पर्जन्यमान, पर्जन्यमानातील खंड, खरिप पेरणी, पिकांची स्थिती, पाणीसाठा, चारा नियोजन, जलसाठा आदी सर्वच विषयांवर व्यापक चर्चा झाली.

लातूर विभागाचे कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर यांनी मराठवाड्यातील आठही जिल्हयातील परिस्थितीबाबत माहिती दिली. बैठकीला मराठवाडा विभागातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांसह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष किंवा व्हर्च्युअल पद्धतीने उपस्थित होते.



# अनधिकृत वजन काटे न वापरण्याचे आवाहन

लातूर : शेजारच्या राज्यांतून वजन काट्याचे सुट्टे भाग व वजन काटे कमी दरात व कररहीत स्वरुपात महाराष्ट्रात विकले जात असल्याने स्थानिक वजन काटे उत्पादक, दुरुस्तक व विक्रेते यांचे नुकसान होत आहे. तसेच राज्य शासनाचा महसूल बुडत आहे. या अनुषंगाने राज्याचे वैध मापन शास्त्र नियंत्रक यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे. तसेच चीन मधून येणाऱ्या अप्रमाणित वजन काट्यांची सुद्धा कमी दरात खुल्या बाजारात विक्री होत आहे. या अप्रमाणित वजन काट्यांमुळे ग्राहकांच्या हिताची हानी होत असल्याने जिल्ह्यात कोणीही अनधिकृत वजन काटे वापरू नयेत, असे आवाहन लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याचे वैध मापन शास्त्र उप नियंत्रक यांनी केले आहे.

चीन मधून येणाऱ्या अप्रमाणित वजन काट्यांना राज्य शासनाची व केंद्र शासनाची वैधानिक मान्यता नाही. अशा वजन काट्यांना अनाधिकृत व्यक्ती त्यांचे स्टिकर लावून त्याची अनधिकृत विक्री करीत आहे. यामुळे ग्राहकांना माल योग्य वजनात मिळू शकत नाही. तसेच महाराष्ट्र शासनाचे महसुलावर परिणाम होत आहे.

त्यामुळे अशा प्रकारच्या अनाधिकृत व्यक्तींकडून वजन काटे खरेदी करू नयेत, असे आवाहन लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याचे वैध मापन शास्त्र उप नियंत्रक यांनी केले आहे.

# शारीरिक क्षमता आणि बुद्धीचे बळ यांचा समन्वय म्हणजे कुस्ती

## - प्रा. डॉ. महेश बेंबडे

लातूर : व्यक्तीची शारीरिक क्षमता आणि बुद्धीचे चातुर्य यांचा सुंदर समन्वयातून कुस्ती या क्रीडा प्रकारात जीवन संदेश लपलेला असतो असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे सिनेट सदस्य डॉ. महेश बेंबडे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या कुस्ती प्रशिक्षण केंद्रामध्ये अ-विभागीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी विचार मंचावर अध्यक्षस्थानी क्रीडा विभाग समिती सदस्य तथा भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, अ-विभाग सचिव डॉ. अशोक वाघमारे, प्रा. मधुकर क्षीरसागर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, प्रा. डी. आर. भुरे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, प्रा. डॉ. बालाजी हालसे, क्रीडा विभाग समिति सदस्य प्रा. डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. आशीष क्षिरसागर, श्री. बाबासाहेब क्षीरसागर आदीची उपस्थिती होती.

या स्पर्धा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी बल देवता हनुमान प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. बेंबडे म्हणाले की, कुस्ती हा क्रीडा प्रकार कुस्तीगीरांच्या शारीरिक आणि बौद्धिक क्षमतांची पारख करणारा खेळ आहे. या खेळातील डाव/प्रति डाव मानवी जीवनासाठी प्रेरक असतात. महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय देऊन कुस्ती कलेला नव संजीवनी दिली. धावत्या स्पर्धात्मक जगात व्यायाम, खेळ, शारीरिक हालचाली, योग, प्राणायाम, योगिक क्रिया, कवायती याकडे दुर्लक्ष केले जात आहे. शारीरिक आरोग्य उत्तम असेल तर बौद्धिक, मानसिक, सामाजिक, क्षमतांचा विकास होतो असेही ते म्हणाले.

यावेळी प्रा. डॉ. अशोक वाघमारे बोलताना म्हणाले की, कुस्ती या खेळा प्रकारातून जिद्द, चिकाटी, नेतृत्व, बुद्धी चातुर्य, वेळेचे व्यवस्थापन, मानसिक व्यवस्थापन या गुणांचा विकास होतो. महात्मा बसवेश्र्वर कुस्ती प्रशिक्षण केंद्राने प्रचंड मेहनतीच्या बळावर लातूर पॅटर्नमध्ये कुस्तीची नवी फॅक्टरी उघडली आहे. लाल मातीची कुस्ती आणि आधुनिक मॅटवरील कुस्ती या दोन्ही प्रकारातून या ठिकाणी प्रशिक्षण दिले जाते. ही कुस्तीसाठी खूप गौरवाची बाब आहे यातून नव्या क्रीडा संस्कृतीची निर्मिती होईल असेही ते म्हणाले

आपल्या अध्यक्षीय समारोपात कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले म्हणाले की, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय हे गुणवंत विद्यार्थी, खेळाडू ,सामाजिक अभियंते, सक्षम अधिकारी घडवणारे संस्कार केंद्र आहे. शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा, संगीत, समाजसेवा, नागरी सेवा या क्षेत्रात महाविद्यालयाने अलौकिक अशा कामगिरी केली आहे. भविष्यात कुस्ती क्रीडा प्रकारातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर लातूरचा नावलौकिक वाढवणारे खेळाडू तयार होतील असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले व सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कररेड्डी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. गुणवंत बिरादार यांनी मानले.

यावेळी पंच म्हणून अण्णासाहेब मुळे, रोहिदास माने, चेतन जावळे, विष्णू भोसले, शिवराज हाके, अमृत बिराजदार व विष्णू तातपुरे यांनी काम पहिले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता यासाठी बालाजी होनराव, शुभम बिराजदार आणि के. आर. कोळी यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात लिंग निवडीस प्रतिबंध कायदा, कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करा

लातूर : जिल्ह्यात लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी लिंग निवडीस प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या भागात संशयित सोनोग्राफी केंद्रांची धडक तपासणी मोहीम राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी 'पीसीपीएनडीटी' समितीच्या बैठकीत दिल्या. यावेळी त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या विविध समित्यांचा आढावा घेतला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहाय्यक जिल्हाधिकारी नमन गोयल, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री जावेद शेख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. अशोक सारडा, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्यासह उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक बैठकीस उपस्थित होते.

जिल्ह्यात लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीसोबतच जनजागृतीवर भर द्यावा. गर्भलिंग निदानाच्या अनुषंगाने सोनोग्राफी केंद्रांची नियमित तपासणी करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यावेळी म्हणाल्या.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचाही आढावा घेतला. जिल्ह्यातील सर्व शासकिय कार्यालये, निमशासकिय कार्यालये व सर्व आरोग्य संस्था तंबाखूमुक्त ठेवण्याच्या सूचना दिल्या. सर्व शाळा तंबाखूमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागाला आदेश दिले. जनतेसाठी आपत्कालीन वैद्यकिय सेवा अंतर्गत १०८ रुग्णवाहिकेची सेवा रुग्णांना वेळेत सेवा उपलब्ध करून द्यावी. तसेच या रुग्णवाहिकेतील डॉक्टरांना बेस लोकेशनला ऑन ड्युटी हजर राहून सेवा देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय सर्व येथे रुग्णांना नियमीत दंत सेवा देण्यात याव्यात. रुग्णालयात आलेल्या रुग्णांची मौखिक तपासणी करून त्यांना आवश्यकतेनुसार औषधोपचार देण्यात याव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती, एचआयव्ही, टीबी व ईएमटीसीटी समन्वय समितीची त्रैमासिक बैठक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीच्या कार्यालयामार्फत जिल्ह्यातील एचआयव्ही, एड्स कार्यक्रमाअंतर्गत विविध घटक निहाय उद्दिष्ट्यपूर्तीचा आढावा घेण्यात आला.

एड्स नियंत्रणासाठी माहिती शिक्षण व संपर्क माध्यमातून जनजागृती करणे, एचआयव्ही बाधीत व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवुन देणे, महायुवा संवाद अभियानातून युवा वर्गामध्ये एचआयव्ही, एड्सबाबत जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या.



# पोलीस पतसंस्था सर्वसाधारण सभा संपन्न

लातूर : लातूर जिल्हा पोलीस अधिकारी, कर्मचारी सहकारी पतसंस्था वार्षीक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली. चेअरमन श्रीमंत मोरे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या सभेस प्रमुख पाहुणे म्हणून अशोक गोविंदपूरकर, बाळासाहेब कन्हेरे, बाबर, बेन हे होते. सूत्रसंचालन अभंगे यांनी तर राजकुमार गुळभेले यांनी आभार मानले.

**छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री**
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

**श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी**
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
**माळवदकर एजन्सीज**
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **RATHI SACHIN KUMAR TO : SACHIN BHAGIRATH RATHI** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **SACHIN BHAGIRATH RATHI** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : RATHI SACHIN KUMAR**
**NEW NAME : SACHIN BHAGIRATH RATHI**
**ADDRESS : SAI NANDAN LAXMI COLONY, LATUR**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **RATHI MADHURI SACHIN KUMAR TO : MADHURI SACHIN RATHI** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **MADHURI SACHIN RATHI** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE
**OLD NAME : RATHI MADHURI SACHIN KUMAR**
**NEW NAME : MADHURI SACHIN RATHI**
**ADDRESS : OLD AUSA ROAD BHAGYA NAGAR LATUR**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **MUSANDE YADAV MAROTI TO : MUSANDE YADAV MARUTI** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **MUSANDE YADAV MARUTI** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : MUSANDE YADAV MAROTI**
**NEW NAME : MUSANDE YADAV MARUTI**
**ADDRESS : AT POST KHAROSA, TQ. AUSA DIST. LATUR.**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **MOHAMMAD AZHAR MOHAMMAD YOONUS TO : AZHAR YOUNUS MOMIN** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **AZHAR YOUNUS MOMIN** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : MOHAMMAD AZHAR MOHAMMAD YOONUS**
**NEW NAME : AZHAR YOUNUS MOMIN**
**ADDRESS : SAWARKAR CHOWK NR GRAM PANCHAYAT KINGAON TQ. AHMEDPUR, DISTRICT- LATUR**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **AFREEN BEGUM MOHAMMAD AZHAR TO : AFREEN BEGUM AZHAR MOMIN** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **AFREEN BEGUM AZHAR MOMIN** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : AFREEN BEGUM MOHAMMAD AZHAR**
**NEW NAME : AFREEN BEGUM AZHAR MOMIN**
**ADDRESS : SAWARKAR CHOWK NR GRAM PANCHAYAT KINGAON TQ. AHMEDPUR, DISTRICT- LATUR**